# बृहन्मुंबई महानगरपालिका

**घन कचरा व्यवस्थापन खाते जी/उत्तर विभाग**

**क्र. सआ(जीउ)/३०८५/घकव्य/दि. २७.११.२०२५**

**स्वारस्य अभिव्यक्ती**

**जाहिरात**

**विषय :-जी/उत्तर विभागामध्ये स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत अशासकीय सामाजिक संस्थेच्या स्वयंसेवकांमार्फत साफ सफाई करणेकरीता संस्थांची सोडत करणेबाबत.**

**उपरोक्त विषयानुसार जी/उत्तर विभागामध्ये स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत दि. ०१.०१.२०२६ ते ३०.०६.२०२६ व ०१.०७.२०२६ ते ३१.१२.२०२६ या कालावधीकरिता अशासकीय सामाजिक संस्थेच्या स्वयंसेवकांमार्फत साफ सफाई करुन घेणेकरीता संस्थेची निवड करण्याबाबत स्थानिक अशासकीय संस्थांची नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था,सेवा सहकारी संस्था,बेरोजगार सेवा सहकारी संस्था,औद्योगिक सेवा सहकारी संस्था , नोंदणीकृत बचत गट संस्था इ. संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**तसेच छाननी शुल्क (ना-परतावा) रु.१२००/- अधिक १८ टक्के जीएसटी असे एकूण रु.१४१६/- हे जी/उत्तर विभागातील घकव्य खात्यामध्ये दि. ०१.१२.२०२५ ते दि. १०.१२.२०२५ सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० या वेळेत प्राप्त करून नागरी सुविधा क्रेद्र येथे दि. ०१.१२.२०२५ ते दि. १०.१२.२०२५ मध्ये भरल्यानंतरच जी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) यांच्या कार्यालयात अर्जाचा नमुना सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० या वेळेतच उपलब्ध होईल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.**

**इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी जी/उत्तर कार्यालयात घ.क.व्य. विभाग जी/उत्तर,पहिला मजला, रुम नं.३५ येथे संपर्क करावा. संस्थेने जी/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख ११.१२.२०२५ (दु.१.०० वाजेपर्यंत) असेल. नमूद केलेल्या कार्यालयीन कालीवधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.**

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त ,जी/उत्तर**